
12:32 PM



# अकोल्यात सायबर वॉरियर्सचे प्रभावी लाईव्ह प्रेझेंटेशन



**अकोला :** शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे 'Cyber Shiksha for Cyber Suraksha Club' च्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती अभियानांतर्गत सायबर वॉरियर्सच्या दहा गटांचे लाईव्ह प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी क्विक हील फाउंडेशन, पुणे येथील श्री. नागेश तलारी हे पर्यवेक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षा, डिजिटल गोपनीयता, सुरक्षित पासवर्ड आणि जबाबदार इंटरनेट वापर यांसारख्या विषयांवर प्रभावी सादरीकरण केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. डॉ. दीप्ती हेमंत पेठकर, विभागप्रमुख, संगणकशास्त्र विभाग तथा समन्वयक यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले.

विद्यार्थ्यांच्या सादरीकरण कौशल्याला चालना देत सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी ठरला.



oooooooooooooooo

**SUPER NEWS 24(मराठी)**

**विजय द. केंदरकर**, ज्येष्ठ पत्रकार

(P. R. O.)

(प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी)